आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२९ मार्च २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- छत्तीसगडमध्ये सुकमा जिल्ह्यात सुरक्षा दलाबरोबर झालेल्या चकमकीत १७ नक्षली ठार

- वैद्यकीय विद्यार्थ्यांनी आपलं ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी सतत शिकत राहावं असं राज्यपालांचं नागपूर एम्सच्या दीक्षांत समारंभात आवाहन

- म्यानमारमध्ये झालेल्या भूकंपात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या एक हजाराच्या वर, भारताकडून ‘ऑपरेशन ब्रम्हा’ अंतर्गत सहाय्य

**आणि**

- आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय कुस्तीपटू मनीषा भानवाला हिला सुवर्णपदक

<><><><><>

छत्तीसगडमध्ये सुकमा जिल्ह्यात आज पहाटे सुरक्षा दलाबरोबर झालेल्या चकमकीत १७ नक्षली ठार झाले. केरलापार पोलीस स्थानकाच्या हद्दीतल्या जंगलात जिल्हा राखीव दल आणि केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या संयुक्त पथकानं काल रात्री नक्षली विरोधी मोहीम राबवली होती. चकमकी दरम्यान सुरक्षा दलाचे दोन जवान किरकोळ जखमी झाले. या कारवाईत ठार झालेल्या १७ नक्षलींचे मृतदेह ताब्यात घेतल्याचं पोलीस सूत्रांनी सांगितलं.

छत्तीसगडमधल्या या नक्षली विरोधी कारवाईच्या पार्श्वभूमीवर, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे की, शस्त्र आणि हिंसाचारानं कोणताही बदल घडणार नसून, शांतता आणि विकासानंच ते साध्य होईल.

<><><><>

वैद्यकीय विद्यार्थ्यांनी आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी सतत शिकत राहावं असं आवाहन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे. नागपूरच्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था अर्थात एम्सच्या पहिल्या दीक्षांत समारंभाला त्यांनी आज संबोधित केलं. विद्यार्थ्यांनी जनुकीय, स्टेम सेल आणि वृद्धत्वाशी संबंधित आजारांवर अधिक संशोधन करून उपचारात्मक पद्धती विकसित कराव्यात असं आवाहन त्यांनी केलं.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते. पूर्व विदर्भात आढळणाऱ्या थॅलेसेमिया आणि सिकलसेल ॲनिमिया यांसारख्या आजारांवर आधुनिक उपचारांची गरज त्यांनी व्यक्त केली. बोन मॅरो प्रत्यारोपणासारख्या उपचारांना महाराष्ट्र सरकारच्या योजनांमधून एम्समध्ये सवलत मिळावी, यासाठी मुख्यमंत्र्यांना विनंती करणार असल्याचं त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही दूरदृश्यप्रणालीद्वारे एम्स नागपूरनं आरोग्य क्षेत्रात बजावलेल्या भूमिकेचं कौतुक केले.

<><><><>

तुळजापूर मंदिर परिसराचा २ वर्षात कायापालट करु असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं आहे. तुळजापूर इथं तुळजाभवानी मातेचं दर्शन घेतल्यानंतर ते बोलत होते. तुळजापूर मंदिर विकास आराखड्याच्या कामाला सरकारने मंजुरी दिली असल्याचे ते म्हणाले.

<><><><>

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक येथील उपकेंद्रांला कोणत्याही व्यक्तीचं नाव द्यायला राष्ट्रवादी काँग्रेस आणि महात्मा फुले समता परीषदेचे नेते छगन भुजबळ यांनी विरोध केला आहे. नाशिक मधल्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठासह राज्यातल्या कोणत्याही विद्यापीठांच्या उपकेंद्रांना वेगळी नावं

दिलेली नाहीत, असं असतानाही वेगळा पायंडा कशासाठी पाडला जात आहे, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे.

**<><><><>**

पंढरपूरमध्ये विठ्ठल-रखुमाईच्या दर्शनाला येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी मंदिर समितीनं सुसज्ज भक्तनिवास उभारला आहे. या ठिकाणी खोल्या आरक्षित करण्यासाठी मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करता येईल. तसंच या ठिकणी वास्तव्याला येणाऱ्या भाविकांना संगणक प्रणालीचा मोफत वापर करता येईल, अशी माहिती मंदिर समितीच्या सूत्रांनी दिली.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर नागपूर इथं येत आहेत. गुढीपाडव्यानिमित्त होणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमात ते रेशीमबागेतल्या स्मृती मंदिर इथं डॉ केशव बळिराम हेडगेवार यांना आदरांजली वाहतील. तसंच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या हजारो अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला, त्या दीक्षाभूमीलाही ते भेट देऊन आदरांजली वाहणार आहेत. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते नागपूरमध्ये माधव नेत्रालयाच्या विस्तार केंद्राची पायाभरणी होणार असून, त्यानंतर ते एका जाहीर सभेला संबोधित करणार आहेत. त्यानंतर प्रधानमंत्री नागपूरमधील सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस लिमिटेड इथं युद्धपयोगी सामग्री चाचणी तळ आणि यूएव्हीसाठी धावपट्टी सुविधेचं उद्घाटन करतील.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी आकाशवाणीवरच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधतील. या कार्यक्रमाचा हा १२० वा भाग आहे. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, वेबसाईट, प्रधानमंत्री कार्यालय, माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे यूट्यूब चॅनल आणि न्यूज ऑन

एआयआर या ॲप वर या कार्यक्रमाचं थेट प्रसारण होईल. त्यानंतर लगेच आकाशवाणीवरून प्रादेशिक भाषांमध्ये कार्यक्रमाचं प्रसारण होईल.

<><><><><>

म्यानमारमध्ये काल झालेल्या शक्तिशाली भूकंपात मृत्युमुखी पडलेल्यांचा आकडा १ हजाराच्या वर पोहोचला आहे. या भूकंपात २ हजार ३७६ जण जखमी झाले असून ३० जण बेपत्ता आहेत. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता असल्याचं स्थानिक प्रशासनानं म्हटलं आहे.

म्यानमारमध्ये काल ७ पूर्णांक ७ दशांश रिक्टर स्केल आणि त्यानंतर पुन्हा ४ पूर्णांक २ दशांश रिक्टर स्केल असे दोनदा भूकंपाचे धक्के बसले होते. थायलंड मधेही या भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. राजधानी बँगकॉकमध्ये ६ जण मृत्युमुखी पडले, २६ जण जखमी झाले, तर ४७ जण बेपत्ता आहेत.

भूकंपग्रस्त म्यानमारच्या मदतीसाठी भारतानं उघडलेल्या 'ऑपरेशन ब्रम्हा' मोहिमे अंतर्गत पाठवलेल्या १५ टन  मानवतावादी सहाय्याची पहिली खेप आज यांगोन इथं पोहोचली. बचाव कार्यासाठी जगभरातून मदतीचा ओघ येत आहे. रशियाच्या आपत्कालीन मंत्रालयानं १२० जणांच्या बचाव पथकासह अत्यावश्यक साहित्य घेऊन दोन विमानं रवाना केली आहेत. चीनचं बचाव पथकही भूकंप शोधक, ड्रोन आणि इतर साहित्यासह,आज सकाळी यांगॉन इथं पोहोचलं. संयुक्त राष्ट्रांनी बचाव कार्यासाठी ५० लाख डॉलर्सची तरतूद केली आहे. म्यानमारमधल्या विनाशकारी भूकंपाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज म्यानमारचे लष्करी अधिकारी जनरल मिन आंग ल्हाईंग यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. या आपत्तीमधल्या जीवितहानी बद्दल त्यांनी शोक व्यक्त केला. एक जवळचा मित्र आणि शेजारी म्हणून, भारत या कठीण काळात म्यानमारच्या जनतेबरोबर असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

जॉर्डनमध्ये अम्मान इथं झालेल्या आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय कुस्तीपटू मनीषा भानवाला हिने सुवर्णपदक जिंकलं आहे. तर अंतिम पंघालने कांस्यपदक मिळवलं आहे. महिलांच्या ६२ किलो वजनी गटात मनीषाने कोरियाच्या ओक जू किमचा ८-७ असा पराभव केला. दरम्यान, ५३ किलो गटाच्या अंतिम पंघालने तैपेईच्या मेंग एच हसीहचा एकही गुण न गमावता पराभव केला. भारतीय कुस्तीगीरांनी या स्पर्धेत आतापर्यंत एक सुवर्ण, एक रौप्य आणि सहा कांस्यपदके जिंकली आहेत. पुरुषांची फ्रीस्टाइल स्पर्धा आजपासून सुरू होत आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज गुजरात टायटन्सचा सामना मुंबई इंडियन्सशी होणार आहे. हा सामना अहमदाबादमध्ये होणार असून संध्याकाळी साडेसात वाजता सामना सुरू होईल. याआधीचे सामने गमावल्यानंतर दोन्ही संघ हा सामना जिंकून पुनरागमन करण्याचा प्रयत्न करतील.

<><><><><>

एमएमआरडीए अर्थात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आगामी वर्षासाठीचा अर्थसंकल्प काल महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सादर केला. या ४० हजार कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या अर्थसंकल्पातला ८७ टक्के म्हणजेच ३५ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी मेट्रो मार्गांचं विस्तारीकरण, नवे बोगदेमार्ग, सागरी मार्ग, जलस्त्रोत विकास आणि नागरी सुविधा यांसारख्या महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पांसाठी राखीव ठेवला जाणार आहे. हा अर्थसंकल्प म्हणजे एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या दिशेनं टाकलेलं महत्त्वाचे पाऊल असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

हा अर्थसंकल्प पायाभूत सुविधांच्या सर्व क्षेत्रात समावेशक प्रगती साधणारा अर्थसंकल्प असून, मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगिण आणि गतिमान विकासाला आपलं सर्वोच्च प्राधान्य असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

नवी मुंबई महापालिकेची मालमत्ता कर भरणा केंद्र २९ ते ३१ मार्च या सुट्ट्यांच्या दिवशी देखील सुरू राहणार आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेची नागरी सुविधा केंद्रं आज आणि उद्या सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत सुरू राहणार आहेत. ३१ मार्च रोजी सकाळी ८ ते मध्यरात्री १२ पर्यंत मालमत्ताकर भरण्याची सुविधा उपलब्ध असणार आहे.

<><><><><>

धुळे शहरातल्या औद्योगिक वसाहतीतल्या एका डेअरीतून पोलिसांनी अडीचशे किलो भेसळयुक्त पनीर जप्त केलं. या कारवाईत साधारणपणे ६० हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

//<><><><><>//